**नवी मुंबई महानगरपालिका**

**महापालिका सर्वसाधारण सभा**

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 24 ऑगस्ट 2018 रोजी भरलेल्या माहे एप्रिल 2018 महिन्याच्या सर्वसाधारण तहकूब सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरूपात खालीलप्रमाणे आहे.:-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 8.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2018** | नमुंमपा क्षेत्रात एल.ई.डी. दिवे लावण्याबाबतचे धोरण निश्चित करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/04/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./646/2018. |
| **ठराव क्र. 526.**<br>**दिनांक 24 ऑगस्ट 2018** | "आयुक्तांचे दिनांक 19/07/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ/1451/2018 चे पत्र लक्षात घेता, **प्रस्तुत विषय मागे घेण्यात आला आहे** असे समजण्यात यावे." |
| **निर्णय.** | **मागे घेतला.** |
| **विषय क्र. 10.**<br>**दिनांक 20 एप्रिल 2018** | वैदयकीय अधिकारी/अपघात वैदयकीय अधिकारी या संवर्गातून सहाय्यक आरोग्य अधिकारी या संवर्गात पदोन्नती देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 04/04/2018 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशासन/आस्था-2/ प्र.क्र. 118/813/2018. |
| **ठराव क्र. 527.**<br>**दिनांक 24 ऑगस्ट 2018** | "वैदयकिय अधिकारी/अपघात वैदयकीय अधिकारी" या सवंर्गातून "सहाय्यक आरोग्य अधिकारी" या सवंर्गात प्रस्तावातील तक्त्यात अ.क्र. 1 व 2 मध्ये नमूद केलेले अधिकाऱ्यांना पदोन्नती देणेबाबत. तसेच "सहाय्यक आरोग्य अधिकारी" या पदावर नियुक्ती करण्याचे अधिकार महापालिकेस निहित आहेत. त्याप्रमाणे उपरोक्त नमुद अधिकाऱ्यांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेरकडील शासन पत्र दि. 29/12/2017 मध्ये नमुद तरतुदीनुसार तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात शासनाने दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. 28306/2017 मधील अंतिम निर्णयास अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने "सहाय्यक आरोग्य अधिकारी" या पदावर नियुक्ती देणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53(1) अन्वये, प्रस्तावात नमुद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय.** | **आयुक्तांकडे परत.** |

**महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी**

**माहे 20 एप्रिल 2018 ची सर्वसाधारण तहकूब सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 47 मधील कै. आण्णासाहेब पाटिल मैदानातील व्यासपिठाचे नुतनीकरण करणे. | 27<br>एप्रिल | 528<br>24/08/2018 | मंजूर |
| 2. | **श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-**<br>श्रमिकनगर खैरणे येथे महानगरपालिके तर्फे ज्युनियर कॉलेज इयत्ता 11 वी व 12 वी पर्यंत शिक्षणासाठी कॉलेज सुरु करणे. | 28<br>एप्रिल | 529<br>24/08/2018 | मंजूर |
| 3. | **श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 47 मधील सेक्टर 08 येथील भूखंड क्र. 8(ए) चे नुतनीकरण करणे. | 29<br>एप्रिल | 530<br>24/08/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 51 कोपरखैरणे, मधील कै. दिनानाथ म्हात्रे उद्यानाचे पुर्णपणे नुतनीकरण करणे. | 30<br>एप्रिल | 531<br>24/08/2018 | मंजूर |
| 5. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 51 कोपरखैरणे, मधील कै. शंकरशेठ नाईक मैदानाची डागडूजी करणे. | 31<br>एप्रिल | 532<br>24/08/2018 | मंजूर |
| 6. | **श्रीम. वैशाली तुकाराम नाईक, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 51 कोपरखैरणे, मधील सी.एन.एल. पार्क सोसायटी मागील बिना रहदारीचा मार्ग हा फेरीवाला क्षेत्र म्हणून राखीव करणे. | 32<br>एप्रिल | 533<br>24/08/2018 | मंजूर |
| 7. | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-**<br>(33) सानपाडा नोड विकसित होत असतांना सिडको प्रशासनाने सानपाडा विभागात तलावाची कुठेही सोय केली नसल्यामुळे सानपाडा नोड मधील रहिवाशीयांना मुर्ती विसर्जन व धार्मिक विधीकार्यासाठी खुप अडचणी निर्माण होत आहेत सीएसटी पनवेल व ठाणे बेलापूर लोहमार्गा दरम्यान सानपाडा अंडरपास जवळ सुमारे 4 ते 5 हेक्टर सिडको प्रशासनाचा भुखंड पडिक अवस्थेत आहे. त्यास आरक्षित करुन सदर भुखंडाचा वापर कृत्रिम तलाव व मैदान म्हणून करणे. | 33<br>एप्रिल | 534<br>24/08/2018 | मंजूर |
| 8. | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-**<br>सानपाडा से. 5 येथील गावठाण विस्तार योजनेअंतर्गत असलेले सर्व सदनिकाधारक अपु-या पाणी पुरवठयामुळे हैराण झाले आहेत. सदर ठिकाणी असलेल्या पिण्याच्या पाईप लाईन हया सिडको कालिन लहान व्यासाच्या असल्यामुळे त्याद्वारे पाणी पुरवठा सुरळीत होत नाही. तरी सदर ठिकाणी असलेल्या पाईप लाईन बदलुन नवीन मोठया व्यासाच्या पाईप लाईन टाकणे. | 34<br>एप्रिल | 535<br>24/08/2018 | मंजूर |
| 9. | **श्री. सोमनाथ चिंतामण वास्कर, यांजकडून :-**<br>सिडको प्रशासनाने गावठाण विस्तार योजना राबवितांना 3 ते 6 मीटर पर्यंत रस्ते बांधले परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे हे सर्व रस्ते अपुरे पडत आहेत त्यात एक मीटर गटर त्यामुळे एखादे वाहन सदर रस्त्यांवर पार्क असेल तर दुसरे वाहन मार्गस्थ होऊ शकत नाही. तरी माझ्या प्रभागातील सानपाडा गावठाण विस्तारात असलेले सर्व गटर हेवी डयुटीने नव्याने बांधवेत जेणेकरुन त्यावरुन वाहक आपले वाहन नेऊ शकेल. तरी सानपाडा से. 5 मधील सर्व पदपथ नव्याने विकसित करणे. | 35<br>एप्रिल | 536<br>24/08/2018 | मंजूर |
| 10. | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 30, घणसोली मधील शाळा क्र. 44 शाळेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता जागा नाही. सदर शाळेच्या इमारतीवर नवीन एक मजल्याचे बांधकाम करुन तो मजला सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता हॉल म्हणून उपलब्ध करुन देणे. | 42<br>एप्रिल | 537<br>24/08/2018 | मंजूर |
| 11. | **श्री. द्वारकानाथ बाबु भोईर, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 30, घणसोली मधील तळवली गाव येथील श्री. सहदेव कुंडलिक पाटील यांच्या घरासमोरील महापालिकेच्या मोकळया भुखंडावर बालवाडी व महिला सक्षमीकरण यासाठी तळमजला व पहिला मजला खोलीचे बांधकाम करुन तयार करणे. | 43<br>एप्रिल | 538<br>24/08/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 49, कोपरखैरणे येथील सागर सोसायटी व चंद्रलोक सोसायटी मधील उदयानात बसण्याचे बाक बसविणे. | 45<br>एप्रिल | 539<br>24/08/2018 | मंजूर |
| 13. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 49, कोपरखैरणे मध्ये मार्ग व सोसायटी दर्शक फलक बसविणे. | 46<br>एप्रिल | 540<br>24/08/2018 | मंजूर |
| 14. | **श्री. रामदास बबनराव पवळे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 49, कोपरखैरणे येथील सेक्टर 9 मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 47<br>एप्रिल | 541<br>24/08/2018 | मंजूर |
| 15. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगपालिकेचे 300 खाटांचे सार्वजनिक रूग्णालय वाशी तसेच 100 खाटांचे ऐरोली व 100 खाटांचे नेरूळ ही सार्वजनिक रूग्णालय सुरू करण्यात आली आहेत. ऐरोली रूग्णालय व नेरूळ रूग्णालय या दोन ठिकाणी "माता बाल रूग्णालय" सेवा फक्त सुरू आहे. नवी मुंबईतील नागरिकांना त्यायोगे आरोग्यसेवा दिली जात आहे. परंतु एम.आर.आय(MRI) व सिटीस्कॅन (CT-Scan) ह्या अतिशय महत्वाच्या महागड्या चाचण्या करण्यासाठी लागणाऱ्या मशिन आपल्या रूग्णालयात उपलब्ध नाहीत. त्यामुळे महानगर-पालिका रूग्णालयात दाखल झालेल्या रूग्णाला ह्या चाचण्या बाहेरच्या सेंटरमध्ये जावून कराव्या लागतात. सर्वसामान्य मध्यमवर्गीय परिस्थितीने गरीब कष्टकरी नागरिकांना ह्या चाचण्या करून घेताना आर्थिक दृष्ट्या शक्य होत नाही व या चाचण्या करणे गरजेचेच असते. नवी मुंबई महानगरपालिकेची तीन सार्वजनिक रूग्णालय उपलब्ध आहेत. योग्य ठिकाणी जागा उपलब्ध करून "आऊट सोरसिंगच्या" माध्यमातून "एमआरआय" व "सिटीस्कॅन" सेवा उपलब्ध करून देणे. | 48<br>एप्रिल | 542<br>24/08/2018 | मंजूर |
| 16. | **श्रीम. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 85, पामबीच सर्व्हिस रोड जवळील गटार हेव्हीड्युटी बांधून त्यावर पदपथ बांधण्यात यावे. तसेच डेकोरेटीव्ह पोल, बैठक व्यवस्था करून वॉकिंग करीता येणाऱ्या लोकांसाठी उपलब्ध करून देणे. | 54<br>एप्रिल | 543<br>24/08/2018 | मंजूर |
| 17. | **श्रीम. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 85, कुकशेत गांव येथील दोन भूखंडा दरम्यान असलेल्या मलनि:स्सारण चेंबर्स व वाहिन्यांची सुधारणा करणे. | 55<br>एप्रिल | 544<br>24/08/2018 | मंजूर |
| 18. | **श्रीम. सुजाता सुरज पाटील, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 85, गांवदेवी मैदानात असलेल्या कै. नरेंद्र बबन पाटील रंगमंचाची सुधारणा करणे. | 56<br>एप्रिल | 545<br>24/08/2018 | मंजूर |
| 19. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 14, ऐरोली से.19 मालसा हाईटस् ते ऐरोली टॉवर व पाण्याची टाकी परिसरपर्यंत नवीन पदपथ बनविणे. | 60<br>एप्रिल | 546<br>24/08/2018 | मंजूर |
| 20. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 14, ऐरोली से.20 त्रिशुल सोसायटी ते शुल सोसायटीपर्यंत हेव्ही ड्युटी गटार बनविणे. | 61<br>एप्रिल | 547<br>24/08/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 21. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 14, ऐरोली से.19 भूमी कोळसा ते काकासाहेब थोरात सोसायटी ते रामदेव अपार्टमेंटपर्यंत रस्त्याची सुधारणा करणे. | 62<br>एप्रिल | 548<br>24/08/2018 | मंजूर |
| 22. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 12, ऐरोली, सेक्टर-2 येथील रहदारी मार्गावरील पेवरब्लॉक नादुरूस्त झालेले असून नागरिक चालताना पेवरब्लॉक खालील खराब पाणी अंगावर उडते, तसेच चालताना लोकांना ठेच लागून व त्यांचा तोल जाऊन तिथे अपघात घडतात. तरी सदर ठिकाणी पेवर ब्लॉक काढून कॉंक्रीटीकरण करणे. | 65<br>एप्रिल | 549<br>24/08/2018 | मंजूर |
| 23. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 12, ऐरोली, सेक्टर-2 येथील झुलेलाल सोसायटी लगतचे हेवीड्युटी गटार तुटलेल्या अवस्थेत असून ती लहान आहे व पावसाळ्यात सदर ठिकाणी नेहमी अपघात होत असतात आणि परिसरात पाणी साचून अपघात होण्याची शक्यता आहे. तरी सदर हेवीड्युटी गटार नव्याने बांधणे | 66<br>एप्रिल | 550<br>24/08/2018 | मंजूर |
| 24. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 12, ऐरोली, सेक्टर-2 येथील साई सदन सोसायटी, गुड हौसिंग सोसायटी, श्री सिध्दीगणेश सोसायटी तसेच अभिलाषा सोसायटी लगतच्या परिसरात गटाराची रचना अद्यावत केली नसून त्या ठिकाणी त्वरीत गटाराची रचना करून सदर ठिकाणी गटार बांधणे. | 67<br>एप्रिल | 551<br>24/08/2018 | मंजूर |
| 25. | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर-16ए, 16 व 18 मधील उर्वरीत रस्त्यांचे डांबरीकरण करून त्याची सुधारणा करणे. | 68<br>एप्रिल | 552<br>24/08/2018 | मंजूर |
| 26. | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर 16ए, 16 व 18 मधील मलनि:स्सारण वाहिन्यांची सुधारणा करणे. | 69<br>एप्रिल | 553<br>24/08/2018 | मंजूर |
| 27. | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 96, नेरूळ सेक्टर 16 येथील छत्रपती संभाजी राजे उद्यानात लाल माती पुरविणे. | 70<br>एप्रिल | 554<br>24/08/2018 | मंजूर |
| 28. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 26, महापे मधील अडवली भुतावली गावात जूनी अंगणवाडी असून 20 वर्षापूर्वी नमुंमपाकडून ही अंगणवाडी बांधण्यात आली होती. आता या अंगणवाडीची खूप दूरावस्था झाली असून पत्रे तुटलेल्या अवस्थेत असून भिंतीही कमकुवत झाल्या आहेत. पावसाळ्यामध्ये पत्र्यामधून व भिंतीतून पाणी येते. यामुळे येथील विद्यार्थ्यांची व शिक्षकांची गैरसोय होत आहे. तरी येथील अंगणवाडीची पुर्नबांधणी करणे गरजेचे असून पुर्नबांधणी करणे. | 71<br>एप्रिल | 555<br>24/08/2018 | मंजूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 29. | **श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 26, महापे मधील अडवली भुतावली गावात सन 1982-83 साली आदिवासी लोकांसाठी इंदिरा आवास योजनेअंतर्गत 84 घरे बांधण्यात आली होती. सद्यस्थितीत त्यांची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झाली असून ही घरे मोडकळीस आली आहेत. या आदिवासींची आर्थिक स्थिती गरीब असल्याने त्यांना या घरांमध्ये राहण्याशिवाय पर्याय नाही. तरी या 84 आदिवासींची घरांची पुर्नबांधणी करणे. | 72<br>एप्रिल | 556<br>24/08/2018 | मंजूर |
| 30. | **श्रीम.सीमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 31, घणसोली मधील सेक्टर 12 येथील साईराज सर्कलचे सुशोभिकरण करणे. | 73<br>एप्रिल | 557<br>24/08/2018 | मंजूर |
| 31. | **श्रीम.सीमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 31, घणसोली मधील मच्छीमार जेटी येथे शौचालय बनविणे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे. | 74<br>एप्रिल | 558<br>24/08/2018 | मंजूर |
| 32. | **श्रीम.सीमा चिंतामण गायकवाड, यांजकडून :-**<br>प्रभाग क्र. 31, घणसोली मधील सेक्टर 8 ते सेक्टर 12 स्मशानभूमी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येवून आगरी चौक ते घणसोली घरोंदा रस्त्याची सुधारणा करून डांबरीकरण करण्यात यावे. तसेच गुणाली तलाव ते स्मशानभूमी सेक्टर 8 येथील रस्त्यांची सुधारणा करून विजेचे खांब लावणे. | 75<br>एप्रिल | 559<br>24/08/2018 | मंजूर |
| 33. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका प्राधिकरणाकडून नागरी सेवा सुविधांच्या निविदा कामांसाठी जारी करण्यात येणाऱ्या कार्यादेशांना मनपाच्या अधिकृत संकेतस्थळी प्रसिध्द करण्याची कार्यपध्दत सुरू करणे. | 79<br>एप्रिल | 560<br>24/08/2018 | मंजूर |
| 34. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंतच्या कालावधीत सन्माननीय पालिका सदस्यांनी प्राप्त अधिकारात मनपाच्या सर्वसाधारण सभेच्या संदर्भाने माननीय आयुक्तांना विचालेले प्रश्न तसेच व प्रश्नांबाबत पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तरांना संच मनपा अभिलेखी जतन करून ठेवलेला पत्रव्यवहाराला पीडीएफ स्वरूपात मनपाच्या अधिकृत संकेतस्थळी प्रसिध्द करण्याची कार्यपध्दत सुरू करणे. | 80<br>एप्रिल | 561<br>24/08/2018 | मंजूर |
| 35. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजासाठी शासनाने मंजूर केलेल्या पदांमधील रिक्त पदांवर तातडीने भरती प्रक्रिया सुरू करून त्यामध्ये प्राधान्याने भूमीपुत्र प्रकल्पग्रस्तांची नेमणूक व मनपाच्या सेवेत असलेल्या पात्र व्यक्तींना पदोन्नती देण्याची कार्यपुर्तता करणे. | 81<br>एप्रिल | 562<br>24/08/2018 | मंजूर |

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**